# डॉ दीपक शिकारपूर ह्यांचा अल्प परिचय



माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रणी म्हणून डॉ दीपक शिकारपूर  हे राष्ट्रीय स्तरावर ओळखले जातात. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सतत वरच्या क्रमांकाने उतीर्ण होणारे डॉ दीपक शिकारपूर  ह्यांनी अभियांत्रिकी पदवी ,व्यवस्थापन क्षेत्राचे पदव्युत्तर व आय टी व्यवस्थापनाची पी एच डी उच्च शिक्षण  घेतले.  आपल्या व्यावसायिक कारकीर्दीचा श्रीगणेशा टाटा उद्योग समूहापासून केला. सुमारे १६ वर्षे विविध पदांवर जबाबदाऱ्या सांभाळल्यावर त्यांनी तंत्र उद्योजक व्हायचा  निर्णय घेतला. सध्या ते कायनेटिक कम्युनिकेशन्स व बेलराइज उद्योगसमूहाचे चे संचालक आहेत.   मार्च २०२३ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र ह्या अग्रणी राष्ट्रीय बँकेने त्यांची निवड ग्राहक सेवा समिती ह्या मंडळावर तीन वर्षासाठी केली आहे .मराठा चेंबर च्या नियामक मंडळावर त्यांची 2022-24 ह्या कालावधीसाठी निवड झाली आहे आपल्या व्यावसायिक कामकाजासाठी त्यांनी आत्तापर्यंत 40 देशांना भेट दिली आहे. आपल्या व्यावसायिक कारकिर्दीत त्यांना अनेक पुरस्कार व बहुमान प्राप्त झाले आहेत .  कॉसमॉस , वीर सावरकर , गो रा परांजपे , रेन्लर परांजपे, शंतनुराव किर्लोस्कर गौरव, सिलिकॉन व्हेली आय टी आयकोन, सांगली भूषण, पर्वती पुण्य भूषण   आदी पुरस्कांनी ते सन्मानित झाले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या हीरक महोत्सवी सांगता समारंभात मा राज्यपाल भगतसिंग कोश्यारी ह्यांच्या हस्ते महाराष्ट्राची गिरिशिखरे ह्या पुरस्काराने २८ डिसेंबर २०२१ रोजी त्यांचा गौरव केला गेला .कॉमप्युटर सोसायटी ऑफ इंडीया ह्या राष्ट्रीय संगणक संघटनेचे ते माजी अध्यक्ष व मानद सदस्य (फेलो) आहेत. रोटरी इंटरनेशनल च्या ३१३१ ह्या प्रांताचे ते २०१३-१४ साठी  प्रांतपाल (District  Governor ) म्हणून  यशस्वी कारकीर्द गाजवली व अनेक विक्रम प्रस्थापित केले. रोटरी च्या जागतिक अध्यक्षांच्या  हस्ते विशेष मानपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले होते. एक संगणक व्यावसायिक  म्हणून यश मिळवण्यात त्यांनी धन्यता मानली नाही. ग्रामीण व निम शहरी भागातील मराठी भाषिक नागरीकांसाठी आधुनिक तंत्रज्ञाचा प्रसार हे आता त्यांच्या जीवनाचे ध्येय आहे. गले लठ्ठ पगाराची परदेशी नोकरी करायचे टाळून मराठी प्रदेश, भाषा व माणूस ह्यांच्यासाठी आपले कार्य सीमित केले. विविध वृत्तपत्रातून येणारे लेख , 51 पुस्तके , अभ्यासपूर्ण व्याख्याने , समुपदेशन ह्या मार्गाने ते उद्याची युवापिढी सक्षम व कौशल्य पूर्ण घडवू इच्छितात. .  ग्रामीण व निम शहरी भागातील युवा पिढी कौशल्य पूर्ण व सक्षम होण्यासाठी ते अनेक उपक्रम राबवीत असतात. नेंस्कोम  चे संस्थापक कै  देवांग मेहता ह्यांना ते गुरुस्थानी मानतात